# मीडिया लिट्रसी

**समस्या**

विद्यार्थी इंटरनेटवर माहिती मिळविण्यासाठी तसेच अभ्यासासाठी बराच वेळ ऑनलाइन घालवतात. इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञानाचा खजिना क्षणात उपलब्ध होत आहे. परंतु, इंटरनेटवर बऱ्याचदा चुकीची माहितीही असते. विद्यार्थ्यांसमोर वारंवार खोट्या बातम्या अशा पद्धतीने मांडल्या जातात की, त्यांना फसव्या गोष्टीदेखील विश्वासाच्या वाटायला लागतात. संशोधनांमध्ये असे आढळून आले आहे की, विद्यार्थी इंटरनेटवर आढळणाऱ्या मजकूराचे मूल्यांकन करण्यासाठी सध्या पूर्णपणे तयार नाहीत. त्यामुळे त्यांना वास्तविक आणि फसव्या माहितीमध्ये फरक करणे कठीण जाते.

**ह्या समस्येवर एक उपाय**

इंटरनेट वापरण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन मजकूर खरे आहे की खोटे हे ओळखण्याची क्षमता आणि गंभीर विचार करण्याची मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे (MIT TSL, 2020). वस्तुस्थिति तपासण्यासाठी तज्ञ अनेक पद्धती वापरतात. यापैकी दोन सोप्या पद्धती म्हणजे ‘क्लिक रिस्ट्रेंट आणि ‘लॅटरल रीडिंग’ (SHEG, 2019).

### क्लिक रिस्ट्रेंट

ऑनलाइन माहितीचे मूल्यांकन करताना, पहिल्या किंवा दुसऱ्या संकेतस्थळावर लगेच क्लिक करणे टाळा. पहिल्या पानाच्या पलीकडे जा आणि इतर संकेतस्थळेही पहा. कोणत्याही संकेतस्थळावर क्लिक करण्यापूर्वी पुढील गोष्टी तपासा:


- **URL**
- **शीर्षक**
- **माहिती उतारा**

### लॅटरल रीडिंग

ऑनलाइन माहितीचे मूल्यांकन करताना, एकाच संकेतस्थळावर लक्ष केंद्रित न करता इतर संकेतस्थळे त्याबद्दल काय म्हणतात हे पाहण्याचा प्रयत्न करा. एका पेक्षा जास्त टॅब उघडा आणि मजकूराचे लेखक किंवा संकेतस्थळ यांबद्दल माहिती मिळवा. मजकूरामागे काय हेतू आहे आणि मजकूर कोणासाठी आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

तुम्ही पुढील प्रश्न विचारात घेऊ शकता:

- ही माहिती कोण प्रस्तुत करत आहे?
- या माहितीबद्दल काही पुरावा उपलब्ध आहे का?
- या माहितीबद्दल इतर स्त्रोत काय म्हणतात






स्त्रोत: https://pixabay.com/illustrations/clipart-cartoon-pencil-stationery-2798937/

अलीकडेच, राहुल नावाच्या तुमच्या एका मित्राने 'मून लँडिंग' (म्हणजेच चंद्रावर उतरणे) कसे बनावटी होते आणि नासाने (NASA) ते कसे घडवले होते याबद्दल एक व्हिडिओ पाठवला आहे. नोंद झालेल्या काही गोष्टींमध्ये अनियमितता आणि मिशनमध्ये काही विसंगती असतानासुद्धा मून लँडिंगवर विश्वास ठेवण्यासाठी लोकांची कशी दिशाभूल केली गेली याची चर्चा या व्हिडीओमध्ये केली गेली आहे. मून लँडिंग हे खरे होते यासंबंधी पुरावे उपलब्ध असताना देखील, या विडियोतून मून लँडिंग बनावटी आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला गेला. या व्हिडओवर काही मित्रांनी 😇, 🤪, LOLआणि 'हु...!' अश्या प्रतिक्रिया दिल्या. पण एका मित्राला मात्र हे पूर्णपणे पटले आणि त्याने ते पुढे त्याच्या मित्रांसोबत शेअर केले.

तुम्हाला आत्तापर्यंत कळाले असेल, की राहुलला वास्तविक आणि फसव्या माहितीमध्ये फरक करणे कठीण जात आहे. इथे तुम्हाला मीडिया लिटरसीचा सराव करून माहिती खरी आहे की नाही हे कसे ओळखायचे हे शिकायला मिळेल. **राहुलला मदत करण्यासाठी तुम्ही शिकलेल्या दोन पद्धतींपैकी म्हणजेच क्लिक रिस्ट्रेंट आणि लॅटरल रीडिंग यांपैकी <u>एक पद्धत</u> समजावून सांगण्यासाठी एक पोस्टर डिझाइन करा.**

तुम्ही आतापर्यंत जे विविध पोस्टर्स पाहिले आहेत त्यांचा विचार करा. काही पोस्टर्स तुम्हाला पाणी वाचवण्याबद्दल किंवा कचऱ्याचा पुनर्वापर करण्याबद्दल माहिती देतात, तर काही रहदारीचे नियम शिकवतात. पोस्टर्स बनवताना तुम्ही जी पद्धत निवडली आहे त्याबद्दल फक्त लिहायचेच नाहीये तर तुमहाला ती पद्धत व्हिज्युअलस् वापरुन समजावून पण सांगायची आहे. यासाठी तुम्ही उदाहरणांचा आणि तुमच्या मजकूरात चिन्ह व चित्रांचा समावेश करू शकता. तुमच्या पोस्टरला शीर्षक द्यायला विसरू नका आणि पोस्टर मनोरंजक तसेच माहितीपूर्ण बनवण्याचा प्रयत्न करा.

# मीडिया लिट्रसी

## पार्श्वभूमी

आजच्या जगामध्ये आपण सर्वजण माहितीच्या समुद्रात वावरत आहोत. या समुद्रात काही चुकीचीही माहिती असू शकते आणि आपण सगळे इन्फोडेमिकशी (UN, 2020; WHO, 2020) लढत असल्याचे आढळून येते. इन्फोडेमिकची व्याख्या 'अति प्रमाणात माहिती' अशी केली जाते. इंटरनेटवर असणारी माहिती काही अचूक तर काही चुकीची असते आणि विद्यार्थ्यांना त्यामध्ये फरक करणे कठीण होऊ शकते (Breakstone et al., 2019). परिणामी, चुकीच्या माहितीमुळे त्यांचे नुकसान होते. खोटी माहिती जागरूकते शिवाय पाठवल्यामुळे ती त्यांच्या मित्रमैत्रिणींमध्ये सुद्धा पसरू शकते. परंतु, काही वेळा लोक चुकीची माहिती जाणून–बुजून दिशाभूल करण्यासाठी पसरवतात (Vosloo, 2021). चुकीची माहिती पसरण्याऱ्या घटना ज्या स्थापित वैज्ञानिक निष्कर्षांना विरोध करतात त्यांबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. यामुळे विज्ञान साक्षरता असणे महत्वाचे झाले आहे. शास्त्रज्ञ वैज्ञानिक माहिती कशा पद्धतीने मिळवतात आणि विविध माध्यमे ही माहिती आपल्यासमोर कशाप्रकारे मांडतात आणि या माहितीच्या आधारे आपण आपली मते कशी बनवतो हे जाणून घेणे विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे झाले आहे (Howell & Brossard, 2021).

मीडिया लिट्रसी या समस्येचे मोठ्या प्रमाणात निराकरण करू शकते. मीडिया लिट्रसी ही इंटरनेटवर सापडलेल्या माहितीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या मजकुराचे मूल्यांकन कसे करावे व त्यावर विचार करून खोटी माहिती कशी ओळखावी हे मीडिया लिट्रसी शिकवू शकते (Moyer, 2022). या कृतीचा पहिला भाग विद्यार्थ्यांमध्ये गंभीर विचारसरणी विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करते, तर दुसरा भाग त्यांचे संवाद कौशल्य वाढवण्यावर भर देते. तसचं ही कृती विद्यार्थ्यांना शब्द आणि चित्रं वापरुन सुसंगतपणे माहिती सादर करण्याची संधि देते आणि सक्रिय शिक्षणासाठी प्रोत्साहित करते (Mayer, 2019).

ही कृती नताशा मुजगुले हिच्या D&T, HBCSE सोबतच्या इंटर्नशिप प्रकल्पाचा एक भाग म्हणून विकसित केली गेली आहे.

## References


Breakstone, J., Smith, M., Wineburg, S., Rapaport, A., Carle, J., Garland, M., & Saavedra, A. (2019). Students' civic online reasoning: A national portrait. Stanford History Education Group & Gibson Consulting.

Howell, E. L., & Brossard, D. (2021). (Mis)informed about what? What it means to be a science-literate citizen in a digital world. *Proceedings of the National Academy of Sciences, 118*(15).

Mayer, R. (2019). How Multimedia Can Improve Learning and Instruction. In J. Dunlosky & K. Rawson (Eds.), *The Cambridge Handbook of Cognition and Education* (Cambridge Handbooks in Psychology, pp. 460-479). Cambridge: CUP.

Moyer, M. (2022, February). Schooled in Lies. *Scientific American, Volume 326*(Issue 2), 34–39.

The Stanford History Education Group (SHEG). (2019). *Home | Civic Online Reasoning.*

MIT Teaching Systems Lab. (2020). *Sorting Truth From Fiction: Civic Online Reasoning.* edX.

United Nations. (2020, March 31). *UN tackles 'infodemic' of misinformation and cybercrime in COVID-19 crisis*.

Vosloo, S. V. (2021, August 24). *Digital misinformation / disinformation and children.* UNICEF Office of Global Insight & Policy.

WHO (2020). Call for Action managing the Infodemic.